नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/११/२०२५ (मंगळवार )**

## केळवद पोलीस , लोधीखेडा पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग, मध्य प्रदेश यांची अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—यां आरोपीतांवर केली संयुक्तीक कारवाई

मध्यप्रदेश राज्यात सिमेवरील काही गावांमध्ये अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारु काढुन सदर दारू महाराष्ट्र राज्यात पुरवली जाते. त्याअनुषंगाने दिनांक ११/११/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीस यांनी लोधीखेडा पोलीस आणि उत्पादन शुक्ल विभाग, मध्य प्रदेश यांच्यासह संयुक्तीक कारवाई करत महाराष्ट्र सिमेवरील जटामखोरा आणि मध्यप्रदेश सिमेवरील वडोना येथील अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारु काढणाऱ्या आरोपीतांवर कारवाई केली असता वडोना येथे एकुण ३००० लिटर मोहाफुल सडवा आणि ६० लिटर मोहाफुल दारू असा मुददेमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. आरोपी यांचे विरुध्द पोस्टे लोधीखेडा येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.







## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १०/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन तिष्टी मार्गे तेलगाव कडे टिप्परमध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तिष्टी बु. बस स्टॉप जवळ नाकाबंदी केली असता टिप्पर क्रं एम.एच ४० बी.एल ०५०२ हे सावरगाव कडुन येताना दिसले. वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला असता त्याने वाहन न थांबविता काही अंतरावर वाहन घेवुन गेला आणि अंधाराचा फायदा घेत वाहन जागीच सोडुन पळुन गेला. पंचासमक्ष पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली तसेच एक किपॅड मोबाईल मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रं एम. एच ४० बी.एल ०५०२ किंमती ३०,००,००० /— रूपये , २) ६ ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये आणि एक किपॅड

मोबाईल किंमती ३,०००/— रूपये असा एकुण ३०,६३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

टिप्पर क्रं एम.एच ४० बी.एल ०५०२ चा **चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे केळवद येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक १०/११/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, खिडकी परीसारातील जाम नदीच्या पात्रातुन अवैध उत्खनन करून अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा जामगाव फाटा येथे नाकाबंदी केली असता लाल रंगाचा स्वराज कंपनीचा विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर हा ट्रॉली सह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक नामे नामे **मयूर तारंश भोयर, वय २५ वर्षे, रा. नारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तो स्वत:च वाहन मालक असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) स्वराज कंपनीचा विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर हा ट्रॉली किंमती ५,००,००० /— रूपये आणि २) २ ब्रास रेती किंमती १०,०००/— रूपये आणि असा एकुण ५,१०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी वाहन चालक/मालक याच्या विरूध्द पोस्टे जाललखेडा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १०/११/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्तबातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की दहेगाव शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) राम बाबपुलाल सिंग, वय ३० वर्ष, रा. दहेगाव, २) मुकेश शेंलेन्द गजभिये,वय ३५ वर्ष, रा. रघपुती नगर, वाडी, नागपुर ३) विजय बळीराम गायधने, वय ४९ वर्ष, रा नवनीतनगर, वाडी, नागपुर, ४) प्रशांत मधुकरराव गोमासे, वय ३४ वर्ष, रा. रघुपती नगर, वाडी ५) अमोल विश्वास कापसे, वय ३९ वर्ष, रा. नालंदा जयताळा, नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते,** रोख रक्कम ३,६२०/— रूपये, ४ अँन्ड्राईड मोबाईल किमंती ३०,०००/— रूपये तसेच ६ दुचाकी वाहने १) होन्डा अॅक्टीव्हा क्र एम.एच ३१ एफ.वाय ४९२२, २) होन्डा अॅक्टीव्हा क्र एम.एच. ४० बी. क्यु. ००५०, ३) मोटर सायकल क्र एम. एच ३१ ई.टी. ७८७४, ४) मोटर सायकल क्र एम.एच ४९ बी.जे ८२९४, ५) होन्डा प्लेजर क्र एम.एच ४० झेड २४१५, ६) अॅक्टीव्हा क्र एम.एच ४० सी. आर ३४७५ किंमती ३,५५,०००/— रूपये असा एकुण ३,८८,६२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या २ आरोपीतांवर २ गुन्हे नोंद कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही**:— दिनांक ११/११/२०२५ रोजी कुही पोलीसांना वळद गावातील पारधी बेडा येथे अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यांबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. कुही पोलीसांनी पथके तयार करून एकाच वेळी पारधी बेडयावर ठिकठिकाणी धाड टाकुन कारवाई केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या एकुण ०२ आरोपीचे ताब्यातुन १७ ड्रम मध्ये एकुण २९८० लिटर मोहाफुल सडवा कि. १,०४,३००/—रुपये, १७

प्लास्टीक ड्रम किंमत ५,१००/— रुपये असा एकुण १,०९,४००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. ०२ आरोपी यांचे विरुध्द पोस्टे कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.





## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री, तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३४ गुन्हे नोंद

**दिनांक १०/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच ईतर साहीत्य असा एकुण ४२,९१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे ४ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन आरोली १ गुन्हा नोंद

आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ४ गुन्हे नोंद आहे.अशाा एकुण ३४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३४ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११७०० मिली देशी दारू किंमती ५२६०/—रूपये, २३१ लीटर मोहाफुल दारू किंमती २३६५०/— रूपये, ४०० लिटर सडवा,किंमती १४,०००/—रूपये, ३६० मिलि विदेशी दारु किंमती ४४०/— रूपये,मोटर सायकल किंमती ९०,०००/—रूपये तसेच ईतर साहीत्य किंमती ३०,४००/— रूपये असा एकुण ४२,९१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३३ आरोपी अशा एकुण ७२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने